## महत्वाचे

## शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार: कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे



**मुंबई । प्रतिनिधी**

कृषी विभागातील केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. राज्याचे कृषीमंत्री म्हणून पदभार घेताना मंत्रालय येथे ते बोलत होते. कृषी विभागात आवश्यक तिथे सुधारणा करून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल. केंद्र व राज्य शासनाच्या योजना राज्यात राबवताना अधिक समन्वय साधला जाईल. कृषी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. प्राधान्याने हाती घ्यावयाचे विषय, नवीन धोरणे यांचा अभ्यास करण्यात येईल. शेती आणि शेतकरी यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास असल्याचेही कृषीमंत्री ड.कोकाटे म्हणाले. यावेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश गोंदावले, उपसचिव हेमंत म्हापनकर, उपसचिव संतोष कराड, उपसचिव प्रतिभा पाटील, उपसचिव अंबादास चंदनशिवे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर उपस्थित होते.

## 'दिलखुलास', 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. नीलम गोऱ्हे यांची मुलाखत



**मुंबई । प्रतिनिधी**


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात दि. ३ जानेवारी या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. 'दिलखुलास'कार्यक्रमात ही मुलाखत गुरूवार दि. २, शुक्रवार दि. ३, शनिवार दि. ४ आणि सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत दोन भागात प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५ रोजी तर दुसरा भाग मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. निवेदक डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केवळ स्त्री शिक्षणासाठीच लढा दिला नाही, तर त्यांनी देशातील दुष्प्रवृत्तींविरुद्ध आवाज उठवला. अस्पृश्यता, बालविवाह, सती प्रथा, विधवा पुनर्विवाहाला बंदी यासारख्या वाईट गोष्टींचा त्यांनी विरोध केला. आयुष्यभर त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे तसेच स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे सावित्रीबाईंनी ओळखले आणि यासाठी त्यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्यासह मोठी कामगिरी बजावली. त्यांचे योगदान आणि विचार आजही कसे मार्गदर्शक आहेत, याविषयी 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. गोऱ्हे यांनी माहिती दिली आहे.

## माजलगावात २ जानेवारीला ओंकार ज्वेलर्सचा भव्य उद्घाटन सोहळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षांपासुन सराफा व्यापारात अग्रेसर असलेल्या येथील सोळंके कुटूंबीयांच्या ओंकार ज्वेलर्सचा भव्य उद्घाटन सोहळा दि. २ जानेवारी २०२५ रोजी होणार असुन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सोळंके कुटूंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळ्यानिमीत्त दि. २ जानेवारीला सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांचे सुश्राव्य असे हरिकिर्तन होणार आहे. अध्यक्षस्थांनी आमदार प्रकाश सोळंके हे तर आमदार संतोष बांगर हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. त्याचबरोबर माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, मोहन जगताप, जयसिंग सोळंके, रमेश आडसकर, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, बाबुराव पोटभरे, अशोक डक, राम कदम, माधव निर्मळ, सहाल चाउस, नितीन नाईकनवरे, विजय साळवे, सातिंधर मैंद यांचेसह अनेकांची उपस्थिती असणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास असंख्य ग्राहक बंधु - भगिनी व हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन ह.भ.प. तुकाराम नाना सोळंके, सुरेश सोळंके, दिलीप सोळंके, ओंकार सोळंके, अमोल सरोदे व समस्त सोळंके - सरोदे परिवाराच्या वतीने करण्यात आले.

## गोविंदराव कुलकर्णी यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

येथील कोषागार कार्यालयातील सेवानिवृत्त तथा औसा तालुक्यातील उटी येथील रहिवाशी गोविंद अण्णाराव उटीकर (कुलकर्णी) यांचे अल्पश आजाराने रविवारी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्यावर उटी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, दोन मुली , नातवंडे असा परिवार आहे. येथील शिक्षक लक्ष्मीकांत खडकीकर यांचे ते सासरे होतं.

# भंडाऱ्यात न्हाली वर्षा अखेरची सोमवती आमावस्या



फोटो : विजयकुमार हरिश्चंद्रे

*या सोहळ्याचा आनंद आणि देवदर्शन करण्यासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती. सोमवारी अमावस्येचा पर्वकाळ सुरु होताच पहाटेपासूनच भोपाळी आरतीला सर्वात झाली पूजा विधी संपन्न होताच दुपारी १ वाजता जेजुरी गडावरुन पालखीचे कऱ्हा नदी स्नानासाठी प्रस्ताव झाले यावेळी समस्त गावकरी खांडेकरी, गुरव पुजारी वर्गाकडून परंपरे नुसार पालखी सजवण्यात आली गाभाऱ्यातील खंडोबा म्हाळसा यांच्या मूर्तींना पालखीत ठेवून मंदिराला प्रदक्षिणा घेत यळकोट यळकोट जय मल्हार चां जयघोष करीत भाविकांनी भंडाऱ्याची उधळण केली यावेळी संपूर्ण जेजुरी गड आणि गाव भंडाऱ्याने न्हाहून निघाला होता . संपूर्ण जेजुरी परिसात जेजुरी पोलिस निरीक्षक दिपक वाकचौरे उपनिरीक्षक दशरथ पुजारी आणि सर्व पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाहीं. याची देही याची डोळा सोनियाची जेजुरी पाहायला मिळाली. या प्रसंगी श्री मार्तंड देवस्थान समिती उपस्थित होती. वर्षअखेर ची यात्रा असल्याने गड भाविकांनी फुलला होता ऐतिहासीक सरदार मल्हारराव होळकर छत्रीमंदीर येथे भेट घेउन.ग्राम प्रदक्षिणा घेत पालखी साडे पाचला कऱ्हानदी वर रवाना झाली सायंकाळच्या २०२४च्या अखेरच्या सूर्यास्ताचे दर्शन घेत मूर्तींना स्नान घालण्यात आलें आणि यात्रेची सांगता झाली.*

## राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जन्म जयंती निमित्त यंदाचा खटोड प्रतिष्ठानचा कीर्तन महोत्सव ३१ डिसेंबर ते ७ जानेवारी

### बीडकर भाविक-भक्तांनी कीर्तन व कथा महोत्वाचा लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज आहिल्यानगर यांची १२५ वी जन्म जयंती संपूर्ण भारतभर सेवाकार्य व शिक्षण या कार्याने साजरी करत आहे. राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांनी आहिल्यानगर येथे वास्तव्य करत असतांना जैन समाजाकडून सर्वसामान्यांची आरोग्याची सेवा व्हावी व शिक्षणाची सेवा व्हावी या करीता वारंवार त्यांनी समाजाला प्रोत्साहित केले होते. त्याचाच भाग म्हणून त्यांचे शिष्य प.पू.आदर्शऋषीजी महाराज यांनी गेल्या ३२ वर्षापासून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून २० हजारापेक्षा सर्वसामान्य रुग्णांचे बायपास, ४० हजारापेक्षा अधिक अँजिओप्लास्टी आणि १ लाखा पेक्षा जास्त डोळ्याचे ऑपरेशन तसेच अनेक आजारांचे ऑपरेशन करुन रुग्णांची सेवा केलेली आहे. या वर्षी अहिल्यानगर येथे शैक्षणिक प्रकल्प देखील उभा करण्याचे काम सुरु आहे. बीड शहरात आनंदऋषीजी हॉस्पिटल सेवा देत असून एकाच छताखाली हॉस्पिटल उभारणी फुलाईनगर येथे लवकरच त्याचे बांधकाम सुरु होत आहे. अशा प्रेरणादायी संतांची १२५ वी जन्म जयंती बीड शहरामध्ये साजरी करावी तेपण संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांनी दिलेल्या शिकवणीप्रमाणे कथा, कीर्तन, भारुड या माध्यमातून ८ दिवस यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न होणार आहे. याची सुरुवात दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. होणार आहे.

**स्व.झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवात १२ सांप्रदायिक कीर्तने, दोन कथा यामध्ये पसायदान या विषयावर ह.भ.प.अनुदराधा दिदी (पंढरपूरकर) या चार दिवस निरुपण करणार आहेत. तसेच ह.भ.प.शिल्पा दिदी (हैद्राबाद) या श्रीकृष्ण निती या विषयावर चार दिवस निरुपण करणार आहेत. दोन्ही कथा १ जानेवारी ते ४ जानेवारी या कालावधीत होणार आहेत.**

## चौसाळा महाविध्यालायात : वाचन - संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाचे उदघाटन

**चौसाळा । प्रतिनिधी**

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे उदघाटन संपन्न झाले. १ ते १५ जानेवारी दरम्यान हा पंधरवडा विविध कार्यक्रमाने साजरा होणार आहे. उदघाटक म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे म्हणाले की, सध्याच्या काळात वाचन संस्कृती लोप पावत असून विधार्थ्यांनी दर्जेदार पुस्तकाचे सतत वाचन केले पाहिजे. समाजावर आपल्या कर्तुत्वाचा ठसा निर्माण करणाऱ्या थोर व्यक्तींच्या आत्मचरित्राचे वाचन केले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य प्रा.चांगदेव शेळके म्हणाले की, वाचन संस्कृतीला गतिमान करण्यासाठी पुस्तके विकत घेऊन वाचण्याची सवय विधार्थ्यांनी स्वतःला लावली पाहिजे. यावेळी व्यासपीठावर पदयुत्तर संचालक प्रा. डॉ. सुधाकर वणवे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अमर अलदे, प्रा.डॉ. संजय कदम उपस्थित होते. या पंधरवाड्यात ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथप्रदर्शन, पुस्तक परिक्षण, कथा कथन स्पर्धा, कविता वाचन असे विविध कार्यक्रमाचे आयोजन कण्यात आले आहे असे ग्रंथपाल प्रा.डॉ. पंढरीनाथ हिरवे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

## जिल्ह्यात १२ जानेवारी च्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत तसेच आगामी कालावधीत नुतन वर्षे साजरे होणार आहे.सध्या बीड जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या मागणी करीता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.



*धर्मापूरी: परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे वेळ अमावस्येनिमित्त पारंपरिक पूजन मोठ्या उत्साहात व श्रद्धेने पार पडले. शेतकरी वर्गासाठी वेळ अमावस्या हा सण विशेष महत्त्वाचा असून तो शेतीशी संबंधित परंपरा आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. छायाचित्रात शेतकरी श्रीमंत फड कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करताना दिसत आहेत*

## मैं सीखा और बहुत कुछ सिखाया है आपने, तरक्की का असली मतलब बताया है आपने, चले जाओगे... माना हमारा साथ छोड़कर, पर हमारे दिल में घर बनाया है आपने।।

काझी अब्दुल माजेद साहेब म्हणजे आयुष्यभर एकाच गोष्टीचा ध्यास घेऊन त्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत धडपडत रहणारे एक अलौकिक व्यक्तिमत्व. काझी साहेबांनी शिक्षण क्षेत्रात आपले स्व:ताचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले नि त्यामध्ये आपले शिक्षणाविषयी प्रेम विद्यार्थ्यांपर्यंत झिरपू दिले. दयेचा सागर म्हणून आज काझी सर यांची ओळख आहे. या त्यांच्या दयेपेक्षाही काकणभर सरस असणारे कार्य - म्हणजे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून दान करण्याची वृत्ती ही फारच उल्लेखनीय आहे. सरांचा जन्म काझी कुटुंबात झाला.काझी शब्दाचा अर्थच असा आहे की जो मुस्लिमांच्या धर्म आणि चालीरीती नुसार न्याय देतो.म्हणजे न्यायाधीश. अशा सुसंस्कृत, न्यायप्रिय कुटुंबात दि.१५ डिसेंबर १९६६ ला धारुर येथे झाला. वडील अब्दुल कादर व आई जुबेदा बेगम यांच्या संसार वेलीवर ह्या रत्नाने जन्म घेतला. सरांनी १९७३ ते १९७७ या कालावधीत आपले प्राथमिक शिक्षण उर्दू माध्यमातून धारुर येथेच पूर्ण केले. पुढील शिक्षण त्यांनी इ.५वी ते १०वी चे मिलिया हायस्कूल बीड येथे १९७८ ते १९८३ मध्ये पूर्ण केले. घरची हलाखीची परिस्थिती,सात बहिणी,दोन भाऊ एवढ्या सदस्यांचा भार वडीलावर असतांना सुद्धा - शिक्षणाची आवड असल्यामुळे त्यांनी जालना येथे डी.एड.चे शिक्षण पूर्ण केले.डी.एड.पूर्ण होताच ते धारुर येथेच नौकरी




करु लागले. शासकीय सेवेत ते दि.३०/११/१९८५ रोजी जि.प.के.प्रा.शाळा.रायमोहा येथे रुजू झाले.येथे ही त्यांनी आपले शैक्षणिक कार्य उत्कृष्टपणे केले.याच कालावधीत त्यांना जि.प.बीड.मार्फत आदर्श शिक्षकपुरस्कार प्रदान करण्यात आला.

एखाद्या व्यक्तीस जर एखाद्याध्येयाची भूक असेल ना तर तो व्यक्ती आपले ध्येय सत्यात उतरवण्यासाठी सतत धडपडत व मार्ग शोधत असतो. सरांनी आपली- शैक्षणिक व विद्वत्तेची भुक क्षमविण्यासाठी सेवेत असतानाच बी.ए.,एम.ए.,बी.एड.पूर्ण केले व ज्ञानाचा कुंभ होऊन- ज्ञानकुंभ झाले.याच ज्ञानाच्या बळावर त्यांनी निवड मंडळाची परीक्षा देऊन माध्यमिक शिक्षक पदावर नियुक्ती मिळवली. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षकी पेशातून ज्ञानदानाचे अमृत पाजले.

जि.प.मा.शा.मुलांची ता.गेवराई येथे कार्यरत असताना १३/०५/२०१३ ला ब्रम्हनाथ येळंब येथे मुख्याध्यापक पदी नियुक्त झाले.या स्थळीही आपल्या कार्यात तसूभरही फरक येऊ दिला नाही.परिस्थितीशी जुळवून व एकरुप होऊन त्यांनी ब्रम्हनाथ येळंब येथे ३१/०५/२०१८ पर्यंत कार्य केले. नि तेथून थेट ०१/०६/२०१८ रोजी जि.प.मा.शा. पोथरा ता.बीड येथे बदलीने रुजु झाले. मी कोण आहे? हे स्व:ताच्या पदाचं अस्तित्व विसरलेले काझी सर काही दिवसातच विद्यार्थी,शिक्षक,पालक, गावकरी यांच्या मध्ये एकरुप झाले. शाळेविषयी असणारी तळमळ,शाळा प्रगतीकडे घेऊन जाण्याची वृत्ती,लागेल त्या भौतिक सुविधा पुरविण्याची दैवी नियत, विद्यार्थ्यांना सतत मदत,शिक्षकांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या कडून शैक्षणिक काम करुन घेण्याची कला ही औरच.सतत सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्यदिव्य आयोजन,१५ऑगस्ट,२६ जानेवारी चे उत्कृष्ट कार्यक्रम आयोजित करणे व या राष्ट्रीय सणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण करणे. सरांच्या कार्यकाळात शाळेने प्रत्येक उपक्रमात घेतलेली उंच भरारी, हिंगोली विज्ञान प्रदर्शनात समावेश,घनवन वृक्ष लागवड,शाळा डिजिटल करणे,असे अनेक उपक्रम राबवून शाळा दृष्टी पटलावर आणली. शाळेचा कणा असलेलं व्यक्तीमत्व व आत्मियतेची,कृतज्ञतेची भावना असलेलं व्यक्तीमत्व म्हणजे शाळेचा महामेरु नि द्वारकेचा खांबच की हो!

गेली कित्येक वर्षे ईश्वरीय तेजाचा अंश घेऊन ज्ञानदानाचे कार्य करणारे काझी सर हे ३१डिसेंबर २०२४ हा दिवस त्यांच्या सेवाकाळातील सेवासमाप्तीचा शेवटचा दिवस आहे.हा दिवस अश्रुंचा मेळा न होता अविस्मरणीय आठवणींचा सोहळा व्हावा. नियमांच्या चौकटीत राहून प्रत्येक जबाबदारी चोखपणे पार पाडण्यांची त्यांची वृत्ती राहिलेली आहे. आपल्या सहकार्याच्या प्रती सहकार्याच्या भावनेतून त्यांनी कितीतरी स्नेहाची ,आपलेपणाची नाती निर्माण केलेली आहेत.सरांचा हा स्नेह मलाही लाभला असल्याने मी स्वतःला भाग्यवान समजतो. सर आपल्या अनुभवाची जागा कुणीही घेऊ शकत नाही म्हणूनच जेंव्हा आपल्यासारखे अनुभवी ,स्नेही मुख्याध्यापक पदोन्नतीद्वारे उच्च पदावर जातात तेंव्हा ते आपलं अस्तित्व आपल्या सोबत नेत असतात.

सर आपण उपशिक्षणाधिकारी (नियोजन) जि.प.बीड या पदी विराजमान झालात ही आनंदाची बाब आहे परंतु आपली पोकळी आम्हाला कायमच जाणवत राहिली. आपण उपशिक्षणाधिकारी पदावर ही कार्य उत्कृष्ट करत आहात यात तीळमात्र शंका नाही. आपण जरी ३१डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आसाल तरी आपला स्नेह आणि मार्गदर्शन सर्वांना मिळत रहावे.आपल्या उर्वरित आयुष्यात आपल्याला सुदृढ, दीर्घायुष्य लाभावे या सदिच्छा !

# संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी ही घटना आहे: ना. रामदास आठवले

## हत्या व खंडणी सर्व आरोपी व मुख्य सुत्रधाराला तात्काळ अटक करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांची भेट घेणार : ना. रामदास आठवले

**केज । प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारे घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग





येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके, दीपक कांबळे यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षारक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ॲट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ?

यावेळी त्यांच्या सोबत राजू जोगदंड, दिपक कांबळे, महावीर सोनवणे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, मझर खान, सुरेश माने, रविराज माळाळे, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, गोवर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, बापू पवार, सादेक कुरेशी, भाई उजगरे, महादेव उजगरे, अरुण निकाळजे, अरुण भालेराव, दीपक कांबळे, धोंडीराम सिरसट, प्रमोद दासुद, सुभाष तांगडे, संदीपान डोंगरे, राहुल सरवदे, अविनाश जोगदंड, सतीश शिनगारे, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, शाम विर, नागेश दुबळे, भाऊसाहेब दळवी, रतन वाघमारे, संभाजी गायकवाड, ईश्वर सोनवणे, निलेश ढोबळे, राजेश सोनवणे, अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर आणि दिलीप बनसोडे, रवी जोगदंड, गौतम बचुटे, सूरज काळे, हरेंद्र तूपारे, प्रशांत हजारे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, रोहित कांबळे, रोहित बचुटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आजी निर्मला खटोड यांच्या प्रेरणेने नातवंडांनी विविध संस्थेला पन्नास कोटीची जागा केली दान

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये स्व.झुंबरलालजी खटोड यांचे कुटूंबीय ६० वर्षापासून वास्तव्य करीत आहे. या शहरचे आपण काही देणं लागतो ही सद्भावना कायम स्व.झुंबरलालजी खटोड यांची असायची. त्यांच्या परिने ते सामाजिक कार्य करीत असायचे. त्यांच्या जाण्यानंतर खटोड परिवाराने प्रतिष्ठानची स्थापना केली. गत २५ वर्षापासून संत विचार समाजात पेरण्याचे काम केले. श्रीमती निर्मला झुंबरलालजी खटोड यांच्या प्रेरणेतून नातू शुभम, आशिष, श्रध्दा, कोमल खटोड या नातवंडांनी विविध संस्थेला समाजोपयोगी कार्यासाठी पन्नास कोटीची जागा दान केली आहे.



राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज अहिल्यानगर यांची १२५ वी जन्म जयंती संपूर्ण भारतभर जैन समाज साजरी करीत आहे. त्यांनी दिलेल्या उपदेशाप्रमाणे सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर येथे प.पू. आदर्शऋषीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवेचा उपक्रम ३२ वर्षापासून चालू आहे. याच संस्थेला म्हणजे जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर या संस्थेला फुलाई नगर बीड येथे दवाखाना व शाळेसाठी ४० कोटी रुपयांची जागा दान केली. तसेच वारकरी संप्रदायाचे संत विचार बालमनावर रुजवण्यासाठी व गोसेवा करण्यासाठी धुळे-सोलापूर महामार्गावरील पेंडगाव जवळ १० कोटी रुपयांची शेत जमीन खटोड प्रतिष्ठानला दान देण्यात आली. नातू शुभम, आशिष, श्रध्दा, कोमल या नातवंडांनी पुढाकार घेवून हे सर्व कार्य केले. स्व.झुंबरलालजी खटोड यांची भावना असायची आपण ग्रामदैवत खंडेश्वरी देवीच्या परिसरात कष्टकरी लोकांमध्ये निवास करत आहोत. सर्व सामान्य समाज बांधवांना आगदी कमी दरात वैद्यकीय सेवा मिळावी, कष्टकरी व सर्वसामान्य समाजाच्या मुला-मुलींना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावं अशी भावना असायची. हा योग अतिशय अनुभव असलेली अहिल्यानगर येथील जैन सोशल फेडरेशन यांनी निर्णय घेतला. या सर्व कार्यासाठी गौतम खटोड, सुशील खटोड, सौ.अनिता खटोड, सौ.मंगला खटोड, सौ.पल्लवी खटोड, सौ.नम्रता खटोड, सिध्दार्थ मुनोत परिवाराला प्रोत्साहन देणारे रतनलालजी नहार, सुभाषचंद्र सारडा, विजयराज बंब, नितीनचंद्र कोटेचा, प्रेमचंद (बाबुसेठ) लोढा, अशोक लोढा, माजी मंत्री प्रा.सुरेशराव नवले, संपतसेठ मुनोत, अमृतकाका सारडा, पत्रकार संतोष मानुरकर, संपादक गंमत भंडारी, भागवत तावरे, बहीण दीपा कोटेचा, भाऊजी अभय कोटेचा, जैन सोशल फेडरेशनचे विश्वस्त सचिन भंडारी यांनी बहुमोल परिश्रम घेतले.



*बीड: रौद्रशंभू प्रतिष्ठानच्या वतीनेकाल बीड येथे आक्रोश मोर्चा च्या निमित्त येणाऱ्या सर्व मोर्चातील लोकांना बीड शहर पोलिस स्टेशन समोर मसाला खिचडी वाटप करण्यात आली . यावेळी उपस्थित रुद्राशंभू चे संस्थापक अध्यक्ष गणेश शिराळे पाटिल, रोहित शिंदे, आनंद देशपांडे, अमोल बारस्कर, सुजित शिंदे, राहुल भांबे,स्वप्नील शेळके, आकाश भड, रौद्रशंभू प्रतिष्ठान चे सर्व सहकारी मित्र उपस्थित होते.*

# ग्रां प सदस्य तथा पत्रकार अशोक शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**नेकनूर । प्रतिनिधी**

पत्रकारितेच्या माध्यमातून केवळ सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे हे काम नाही . तर समाजातील लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करुन त्यांना न्याय मिळवून देणेही गरजेचे आहे . या दोन्ही भुमिका पार पाडतांना सामाजिक उत्तरदायित्व म्हणून दर वर्षी समाजातील वृद्धांच्या आयुष्यांना प्रकाशमान करण्याचा निर्णय ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार अशोक शिंदे यांनी मागील पाच वर्षापासून घेतला आहे . वाढदिवसावर अनावश्यक खर्च न करता या वर्षी एक जानेवारी वाढदिवसाचे औचित्य साधून, जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताचा प्रचंड तुटवडा याची गरज लक्षात घेत , मंगळवार ३१ डिसेंबर थर्टी फर्स्ट च्या दिवशी सकाळी



१० ते १ या वेळेत स्त्री व कुटीर रुग्णालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे तरी मित्र परिवार , रक्त दात्यांनी रक्तदान करून कुणाचं तरी जीव वाचवण्यासाठी याच रक्ताची मदत होईल याच भावनेने रक्तदान हेच श्रेष्ठदान हे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

नेकनूर सारख्या ग्रामीण भागातून पत्रकारिता करतांना वंचित, उपेक्षीतांचे प्रश्न मांडण्याचं काम अशोक शिंदे यांनी सातत्याने केले आहे .

दि .१ जानेवारी असलेल्या त्यांच्या वाढदिवसाला अनावश्यक खर्च न करता सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे एक जानेवारी वाढदिवसाचे औचित्य साधून, जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताचा प्रचंड तुटवडा याची गरज लक्षात घेत , मंगळवार ३१ डिसेंबर थर्टी फर्स्ट च्या दिवशी सकाळी १० ते १ या वेळेत स्त्री व कुटीर रुग्णालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे तरी मित्र परिवार , रक्त दात्यांनी रक्तदान करून कुणाचं तरी जीव वाचवण्यासाठी याच रक्ताची मदत होईल याच भावनेने रक्तदान हेच श्रेष्ठदान करण्याचे आवाहन केले आहे

# पत्रकार संग्राम धन्वे यांना जिवे मारण्याची धमकी; पत्रकार संरक्षण कायद्याआंतर्गत गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बुधवार दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अंबिका चौकामध्ये सा. शिवसुर्य तथा मराठी महाराष्ट्राचे संपादक संग्राम धन्वे यांना दोन अनोळखी तरुणांनी शिवीगाळ करत मारहाण केली. संपादक संग्राम धन्वे यांच्या फिर्यादीवरून बीड शहरातील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी बीड शहरातील अंबिका चौक येथे वाहतूक शाखेच्या वतीने ध्वनिप्रदूषण कमी करण्याच्या कारणाने दुचाकी रॉयल इनफील्ड. एम.एच. १४ बी. डब्ल्यु ६३०३ या (बुलेट) च्या कर्कश आवाजाने सायलेंसर काढून घेण्याची कारवाई सुरू असताना पत्रकार संग्राम धन्वे हे अंबिका चौकतून जात होते पोलिसांची कारवाई सुरू असल्याचे निदर्शनास आले. ती कारवाई सुरू असल्याचे पाहून संग्राम धन्वे यांनी सदरील कारवाईचे बातमीकामी व्हिडिओ चित्रीकरण केले. त्यानंतर सदरील दुचाकीवरील दोन तरुण धाऊन आंगावर आले आमच्या गाडीची व्हिडीओ का काढतो म्हणत धक्काबुक्की करत मारहाण केली. त्यावेळी वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरिक्षक सानप व वाहतूक शाखेचे कर्मचारी वाघमारे हे उपस्थित होते. त्या अधिकाऱ्यांनी संग्राम धन्वे यांना सुरक्षा दीली असे संग्राम यांनी सांगीतले.

मात्र गर्दीचा फायदा घेत त्यांनी पत्रकार धन्वे यांना मारहाण केली. तर दूचाकी स्वार जाता जाता असेही म्हणाले की पोलीस असल्यामुळे तू वाचला तू बाहेर ये तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत सदरील तरुण दुचाकीवर बसून निघून गेले.

त्यामुळें संग्राम धन्वे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र राज्यातील प्रसारमाध्यमातील व्यक्ती आपली कर्तव्ये पार पाडत असताना त्यांच्यावर होणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रसारमाध्यमातील व्यक्ती किंवा प्रसारमाध्यम संस्था यांच्या मालमत्तेचे नुकसान किंवा हानी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम १७नुसार तसेच

१ भारतीय न्यायिक संहिता, २०२३ ११५(२), २ भारतीय न्यायिक संहिता, २०२३ ३५२ , ३ भारतीय न्यायिक संहिता, २०२३ ३५१(२), ४ भारतीय न्यायिक संहिता, २०२३ ३५१(३), ५ भारतीय न्याय साहित्य, २०२३ ३(५), वरील कलमानुसार दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक बोल्डे यांच्याकडे आहे.

### भाटवडगावात भागवत कथा व किर्तन महोत्सव

# भाविकांनी लाभ घ्यावा: ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री. संत ज्ञानदेव संगीत विद्यालय गुरूकुल माजलगाव यांच्या वतीने ह.भ.प. गुरूवर्य तुकाराम महाराज शास्त्री यांच्या आशिर्वादाने भव्य श्रीमद् भागवत कथा व किर्तन महोत्सव तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन नविन वसाहत भाटवडगाव येथे दि. १ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात आले असुन भागवत कथा व हरिकिर्तनाचा भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे यांच्या वतीने करण्यात आले आहे. याठिकाणी कथा प्रवक्त्या ह.भ.प. भागवताचार्य संगीता ताई कोरडे या आहेत तर ह.भ.प. वैष्णवीताई धायगुडे, ह.भ.प. दिपक महाराज



बादाडे, ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर,ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री, ह.भ.प. भगवान महाराज राजपुत, ह.भ.प. प्रकाश महाराज साठे, ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांची हरिकिर्तन होणार आहेत तर दि. ८ जानेवारीला ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. मृदंगवादनासाठी मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, युवराज महाराज लवटे तर गायनाचार्य रमेश महाराज बिटे, आप्पा महाराज चिलगर हे असणार आहेत. भागवत कथा व हरिकिर्तनाचा भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शासकीय अधिकारी,कर्मचारी सरपंच यांनी जनतेच्या हिताची कामे करण्यासाठी सकारात्मक रहावे : आ.सुरेश धस यांनी व्यक्त केली अपेक्षा

**आष्टी । प्रतिनिधी**

ज्या शासकीय अधिकाऱ्यांना जनतेच्या हिताची कामे करण्याचा कंटाळा न ठेवता शासनाच्या योजनांची माहिती देण्यात तत्परता दाखवावी अशी अपेक्षा सुरेश धस यांनी व्यक्त केली आहे मात्र ज्यांना जनतेच्या हिताची ही कामे करावयाचे नसतील त्यांनी इतरत्र बदली करून जावे असा इशाराही आ.सुरेश धस यांनी दिला आहे.. आष्टी,पाटोदा, शिरूर (कासार) विधानसभा मतदारसंघातील.. सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र या संघटनेच्या आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील संघटनेचे सदस्य सरपंच, उपसरपंच, तसेच ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक संघटना, ग्रामरोजगार सेवक संघटना, व कृषी विभाग अधिकारी-कर्मचारी संघटना यांनी आयोजित केलेली संयुक्त संवाद बैठक आज आष्टी येथे संपन्न झाली. त्यामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



ज्या योजनेसाठी ग्रामस्थांकडून दगड गोटे खाल्ले ज्या योजनेची सुरुवात मी केली त्या सीना मेहकरी आणि खुंटेफळ साठवण तलावाची योजना लवकरच पूर्ण होणार असल्याचे यावेळी धस म्हणाले.या संवाद बैठकीला सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र या संस्थेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, गटविकासधिकारी आष्टी सचिन सानप , गटविकास अधिकारी पाटोदा बागलाने,आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, पाटोदा तालुका कृषी अधिकारी पवार,शिरूर का.तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके, सहाय्यक कृषी अधिकारी सचिन राऊत, सरपंच परिषद तालुकाध्यक्ष सुधीर पठाडे, सरपंच संदिप खटाळ, सरपंच युवराज पाटील, रोजगार सेवक संघटना महा.राज्य हनुमंत पोठरे, रोजगार सेवक संघटनेचे आंदुरे, आष्टी तालुका ग्रामसेवक संघटनेचे प्रमुख लोंढे, पाटोदा तालुका ग्रामसेवक संघटना प्रमुख नागरगोजे,ग्रामसेवक संघटना शिरूर का. अशोक मिसाळ यांच्यासह महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना,डी. एन.ई.-१३६,कृषी विभाग,ग्राम रोजगार सहाय्यक संघटना आष्टी-पाटोदा-शिरूर कासारचे बहुसंख्य पदाधिकारी,सरपंच, उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य आदी उपस्थित होते.

